
# महाराष्ट्र क्विअर वृत्त

## जिल्हा निहाय संस्था गट व समुदाय कार्यवृत्त

**अंक दुसराः जुलै-सप्टेंबर २०२२**




BINDU QUEER RIGHTS FOUNDATION

**प्रकाशकः बिंदू क्विअर राइट्स फाऊंडेशन**

# महाराष्ट्र क्विअर वृत्त

**त्रैमासिक : अंक दुसरा : जुलै - सप्टेंबर २०२२**

प्रकाशक

बिंदु क्विअर राईट्स फाऊंडेशन

(CIN: U85300PN2019NPL182601)

पुणे, महाराष्ट्र

# महाराष्ट्र क्विअर वृत्त

## e-त्रैमासिक : अंक दुसरा : जुलै - सप्टेंबर २०२२

**Maharashtra Queer News. Quarterly e-magazine. Issue 2. July - September 2022.**

Publisher: Bindu Queer Rights Foundation (Pune, Maharashtra)
(CIN: U85300PN2019NPL182601)
Directors: Bindumadhav Khire, Tinesh Chopade
प्रकाशक: बिंदु क्विअर राईट्स फाऊंडेशन (पुणे, महाराष्ट्र)
संस्थापक: बिंदुमाधव खिरे, टिनेश चोपडे

प्रकाशन: एप्रिल २०२२
© बिंदु क्विअर राईट्स फाऊंडेशन
संपादक: बिंदुमाधव खिरे
संपर्क: bqrf2019@gmail.com / व्हाटसॅप: ९७६३६४०४८०

All rights reserved. No part of this magazine be reproduced or utilized in any form in whole or in part (except for brief quotations in critical articles or reviews) by any means, including but not limited to electronic or mechanical format by photocopying, audio, or video recording, or by using any information storage or retrieval system, without prior permission in writing from the publisher or author.

**Disclaimer**

The articles published in the magazine are an expression of views of the respective authors; therefore, the editor and the publisher will not be liable, in any manner, for any of the information disclosed through such articles. The views expressed through the articles shall not constitute any sort of legal assistance or opinion and shall not be used by the readers and consumers of the information in that sense.

This magazine has been prepared for general information only. It is not to be substituted for any professional or personal advice or to be considered as such advice. Though every effort has been made to avoid any mistake or omission, the publication is being distributed on the condition and understanding that the authors, collaborators, editors, publishers, and printers would not be liable in any manner to any person/institution by reason of any mistake or omission in this publication or for any action taken or omitted to be taken or advice rendered or accepted based on this work. All disputes are subject to the exclusive jurisdiction of Courts, Tribunals, and Forums at Pune, Maharashtra.

हे e-मासिक बौद्धिक संपदा अधिकारांचा हक्क अबाधित ठेवून, उपरोक्त नमूद अटी/शर्तीस आधीन राहून मोफत वितरणासाठीआहे.

## संपादकाचे दोन शब्द

पहिला अंक काढल्यावर अपेक्षा होती, की दुसऱ्या अंकासाठी अधिक प्रमाणात महाराष्ट्रातील संस्था/गट आपल्या कार्याची माहिती देतील, पण तसे झाले नाही. याची मला वाटतात ती कारणे अशी- या मासिकात आपल्या कार्याची माहिती देणे हे संस्था/गटाला महत्वाचे/ गरजेचे वाटत नाही, किंवा कामच होत नाही तिथे माहिती काय द्यायची हा प्रश्न आहे, किंवा काही राजकीय हेतू, किंवा आम्ही काम करतोय हे ही कोणाला सांगायचं धाडस नाही, किंवा आळस- हे लिहायचा त्रास कोण घेणार? आणि त्याच्या मोबदल्यात आम्हाला काय मिळणार? या LGBTIQA समाजाची हीच शोकांतिका आहे. ती पुढेही अशीच राहीली तर मला आश्चर्य वाटणार नाही.

काही सूचना असल्यास त्या इमेल: bqrf2019@gmail.com वर जरूर कळवा.

**विशेष नोंद**

- महाराष्ट्रातील काही जिल्हे असे आहेत, की जिथे काम चालू आहे पण तेथील संस्था, गटांनी त्यांचा कार्याची माहिती दिली नाही. ज्यांनी माहिती पाठविली ती देत आहोत.

बिंदुमाधव खिरे
ऑगस्ट २०२२

**आभार**

हे ई-मासिक काढण्यास अनेकांचा मोलाचा हातभार लाभला  आहे. त्यांची नावे खाली देत आहोत. या सर्वांचे मनापासून आभार.

**चंद्रपूर:** राज कचोले (प्रकल्प संचालक, 'संबोधन ट्रस्ट')
**नंदुरबार:** महेश्वरी ठाकरे ('नवचैतन्य सामाजिक संस्था')
**पुणे:** अनिल उकरंडे (गट नेता 'युतक'), प्रसाद गोंदकर ('पुणेरी प्राईड फौंडेशन')
**सोलापूर:** सीमा किणीकर मॅडम(संस्थापिका, संचालिका 'निरामय आरोग्य धाम'), शिवाजी शिंदे (प्रकल्प  संचालक), प्रदीप पाटील (पिअर एज्युकेटर )
**वर्धा :** डॉ. इंद्रजीत खांडेकर (महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स)

- मासिकाचे कवर डिझाईन व लेआऊट चंद्रशेखर बेगमपुरे यांनी केले.
- मराठी टायपिंगसाठी दिगंबर बिराजदार यांनी मदत केली.

या सर्वांचे मनापासून आभार.

**बिंदुमाधव खिरे**
ऑगस्ट २०२२

## अनुक्रमणिका



| जिल्हा | माहिती/कार्य | लेखक | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| अहमदनगर | | | -- |
| अकोला | | | -- |
| अमरावती | | | -- |
| औरंगाबाद | | | -- |
| बीड | | | -- |
| भंडारा | | | -- |
| बुलढाणा | | | -- |
| चंद्रपूर | | | -- |
| धुळे | | | -- |
| गडचिरोली | | | -- |
| गोंदिया | | | -- |
| हिंगोली | | | -- |
| जळगाव | | | -- |
| जालना | | | -- |
| कोल्हापूर | अभिमान गट | विशाल पिंजानी | ०७ |
| लातूर | | | -- |
| मुंबई | | | -- |
| नागपूर | | | -- |
| नांदेड | | | -- |
| नंदुरबार | नवचैतन्य संस्थेचे कार्य | माहेश्वरी ठाकरे | ०९ |
| नाशिक | | | -- |
| उस्मानाबाद | | | -- |
| पालघर | | | -- |
| परभणी | | | -- |
| पुणे | पुणे LGBTIQA अभिमान पदयात्रा | बिंदुमाधव खिरे, अनिल उकरंडे | ११ |
| | बिंदू क्विअर राईट्स फौंडेशन चे कार्य | बिंदुमाधव खिरे | १६ |
| | युतक गटाचे कार्य | अनिल उकरंडे | १८ |
| | पुणेरी प्राईड फौंडेशनचे कार्य | प्रसाद गोंदकर | २३ |
| रायगड | | | -- |
| रत्नागिरी | | | -- |
| सांगली | | | -- |
| सातारा | | | -- |
| सिंधुदुर्ग | | | -- |
| सोलापूर | निरामय आरोग्य धामचे कार्य | शिवाजी शिंदे, प्रदीप पाटील | २८ |
| ठाणे | | | -- |
| वर्धा | लेख: कन्वर्जन थेरेपी'वरील गैरसमजुतीचा थर पुसणे गरजेचे | डॉ.इंद्रजीत खांडेकर | ३२ |
| वाशिम | | | -- |
| यवतमाळ | | | -- |



.

# जिल्हा: कोल्हापूर

### अभिमान गट

**माहिती**

'अभिमान' हा कोल्हापूर शहरातील गट आहे जो LGBTQIA+ समुदायाचे सक्षमीकरण करण्याचे काम करतो. आपली लैंगिकता/लिंगभावाशी संघर्ष करत असलेल्या लोकांना भावनिक आधार देतो. या गटाची स्थापना समविचारी समुदाय सदस्यांच्या गटाने केली आहे.

अभिमानशी कनेक्ट होण्यासाठी त्यांच्या फेसबुक किंवा व्हॉट्सअ‍ॅप पेजला ("अभिमान कोल्हापूर") फॉलो करा.

**संपर्क:**

संपर्क क्रमांक / व्हॉट्सअ‍ॅप: 9922295522
ई-मेल: abhimaan.kolhapur@gmail.com

### एप्रिल २०२२ ते जून २०२२ मधील कार्य

समलिंगी उभयलिंगी पारलिंगी व्यक्तींना मिळणाऱ्या द्वेषपूर्ण वागणुकीचा निषेध म्हणून १७ मे 2022 या दिवशी आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कोल्हापुरात एलजीबीटीक्यू समुदायासाठी काम करणाऱ्या 'अभिमान' या संस्थेनेही आपल्या शहरात या विषयाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने नुकतच हॉटेल 'सिट्रस' येथे एका कार्यक्रमाचे आयोजन केलं होतं.

'विविध लैंगिक ओळखी आणि लैंगिकता' हा विषय अधिक स्पष्ट करून सांगणाऱ्या व्याख्यानांचा या कार्यक्रमात समावेश केला होता.

लेखक-नाटककार जमीर कांबळे यांनी एलजीबीटीक्यू समुदायांतर्गत असणाऱ्या स्तरभेदाबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत पहिल्या पारलिंगी कवयित्री दिशा पिंकी शेख यांची कविता सादर केली.

प्रस्तुत कार्यक्रमात एलजीबीटीक्यु समुदायातील विविध घटकांनी त्यांना समाजाकडून मिळणाऱ्या त्रासाबद्दल आणि सहकार्याबद्दलचे विविध अनुभव उपस्थितांसमोर मांडले. या कार्यक्रमांतर्गत कोल्हापूरच्या 'वालावलकर हॉस्पिटल'च्या डॉ. वालावलकर यांच्याकडून एलजीबीटीक्यू समुदायातील मंडळींसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचेही आयोजन केलं गेलं होतं.

कार्यक्रमाचा शेवट नृत्य सादरीकरणाने झाला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी 'अभिमान' कोल्हापूरचे संस्थापक सदस्य विशाल पिंजानी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रयत्न केले.




आयोजक विशाल पिंजानी



कार्यक्रमातील सहभागी

## जिल्हा: नंदूरबार

### नवचैतन्य फाऊंडेशन
महेश गव्हाले (CBO) अध्यक्ष, राजु ठाकरे (संस्था) अध्यक्ष

### संपर्क
संपर्क क्रमांक: 9922593837, 9637165372
ई-मेल: ncfnandurbar@gmail.com
लेखक: माहेश्वरी ठाकरे

### माहिती
'नवचैतन्य फाऊंडेशन' व 'विघ्नहर्ता सेवाभावी बहुउद्देशीय संस्था' MSM व तृतीयपंथी समुदायातील व्यक्तींसाठी काम करण्यात अग्रेसर असते.

### एप्रिल २०२२ ते जून २०२२ मधील कार्य

दिनांक 29/06/2022 रोजी समाज कल्याण व नवचैतन्य फौंडेशन व विघ्नहर्ता सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने समाज कल्याण निवासी शाळा येथे सामाजिक वंचित घटकांसाठी (तृतीयपंथी) लाभार्थ्यांचे आरोग्य शिबिर व कायदेविषयक कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रमास नंदुरबार तालुका विधायक समितीचे विधी सेवा प्राधिकरण कॉलेजचे प्राचार्य, श्री. नितेश चौधरी सर उपस्थित होते. तसेच डॉ. राजेश वसावे ('नेम्स हॉस्पिटल', नंदुरबार) वकील विनया मोडक मॅडम, संस्थेचे अध्यक्ष महेश गव्हाले सर तसेच संस्थेचे अध्यक्ष राजू ठाकरे आदी उपस्थित होते.



सत्कार समारंभ



कार्यक्रमातील सहभागी



आरोग्य शिबीर

दिनांक ०३.०६.२०२२ रोजी भारत सरकार सामाजिक न्याय अधिकारिता मंत्रालयातर्फे समाज कल्याण सभागृहात सामाजिक वंचित घटकांसाठी नाव नोंदणी बाबत एक दिवसीय विशेष शिबिर घेण्यात आले. सामाजिक वंचित (तृतीयपंथी) घटकांना मार्गदर्शन करण्यास समाज कल्याण निरीक्षक कोकणी सर व समाज कल्याण प्रकल्प बार्टी अधिकारी मीनाक्षी दानवेकर मॅडम उपस्थित होत्या. तसेच नवचेतन फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष महेश गव्हाले, विघ्नहर्ता सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष राजू ठाकरे आदी उपस्थित होते.



# जिल्हा: पुणे

## पुणे LGBTIQ अभिमान पदयात्रा २०२२

बिंदू क्वियर राइट्स फाउंडेशन (BQRF) व युतक यांनी संयुक्तपणे पुणे शहराची दहावी वार्षिक अभिमान पदयात्रा रविवार, दिनांक ५ जून २०२२ रोजी आयोजीत केली होती. यावर्षीची अभिमान पदयात्रा ही सर्वसमावेशक विवाह कायदा या मागणीसाठी काढली गेली या पदयात्रेचे ग्रॅन्ड मार्शलLGBTIQA ॲक्टीविस्ट अनिल उकरंडे होते. पदयात्रा छत्रपती संभाजी उद्यानापासून दुपारी २:३० वाजता सुरु झाली.



ग्रॅन्ड मार्शल अनिल उकरंडे

खर तर ही पदयात्रा सकाळी १०:३० वाजता आयोजित केली होती, पण ४ जून २०२२ ला रात्री पोलिसांनी कळवले की त्या भागात कोणी व्हीआयपी येणार आहेत म्हणून वेळ बदलून दुपारी २:०० वाजता पदयात्रा काढण्याची पोलिसांनी परवानगी दिली. यामुळे आमची (BQRF व युतक) ४ जून २०२२ ला रात्री व ५ जून २०२२ ला सकाळी चांगलीच धांदल उडाली. पण तरी सुद्धा सर्व काही व्यवस्थित पार पडले. यासाठी आम्ही पुणे पोलिसांचे- विशेष करून- वाहतूक आयुक्तालय, डेक्कन वाहतूक विभाग, डेक्कन पोलीस स्टेशन व बालगंधर्व पोलीस चौकी येथील पोलिसांचे मनापासून आभारी आहोत.

या पदयात्रेसाठी आम्हाला पुण्यातील LGBTIQA समुदायाची खूप मोठ्या प्रमाणात साथ मिळाली. तसेच पुण्याबाहेरूनही अनेक LGBTIQA तरुण मुलं-मुली-तृतीयपंथी या पदयात्रेला आले होते. त्यांनी खूप संयम दाखवत आम्हाला साथ दिली. या सर्वांचे BQRF व युतक मनापासून आभारी आहोत.

या पदयात्रेत १००० पेक्षा अधिक समर्थक सहभागी झाले होते.

या वर्षीच्या अभिमान पदयात्रेत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, पहिल्या महिला शिक्षिका फातिमा शेख, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व र. धों. कर्वे या थोर व्यक्तींना मानवंदना देऊन पदयात्रा सुरु करण्यात आली. मानवंदने नंतर ट्रान्सवुमेन झोया यांनी संविधानाचे प्रास्ताविक(Preamble) मोठ्याने वाचले, व तिच्या मागोमाग सर्व सहभागी व्यक्तींनीही हे प्रास्ताविक वाचले.



ट्रान्सवुमन झोया मानवंदना देतांना

LGBTQ समाजाला कायम मदतीचा हात देणारे व २०१४ चा पुणे LGBTIQA अभिमान पदयात्रेत गुलाबाची फुले देऊन सदिच्छा देणारे माजी पोलीस उपायुक्त भानुप्रताप बर्गे साहेब यांचा सत्कार करण्यात आला.



माजी पोलीस उपायुक्त भानुप्रताप बर्गे साहेब यांचा सत्कार अनिल उकरंडे करताना



डॉ. कांचन पवार यांचा सत्कार

कोविड वॉरियर्स म्हणून डॉ. कांचन पवार आणि डेक्कन पोलीस विभागाचे पोलीस अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.



ट्रान्सजेंडर समाजासाठी काम करणाऱ्या ॲक्टीविस्ट सोनाली दळवी यांचा सत्कार

CPI(M) व वंचित बहुजन आघाडी या पक्षांनी समलैंगिक विवाह कायदा बनवा या मागणीसाठी पाठींबा दिला म्हणून त्यांचे आभार मानण्यासाठी एक 'स्वाक्षरी मोहीम'(signature campaign) केली गेली.






साय ४:०० वाजता फर्ग्युसन कॉलेज च्या मेन गेट जवळ पदयात्रा समाप्त झाली. शेवटी सर्वांनी सामुदायिक रित्या 'हम होंगे कामयाब' हे गीत गायले व पदयात्रेचा समारोप झाला ३५ हून अधिक तरुण-तरुणींनी ही पदयात्रा खूप छान झाली असा लेखी अभिप्राय  दिला.

( या पदयात्रेची बातमी ETV भारत व्हिडीओ लिंक: https://youtu.be/Y4ypxE9Rqu4 )

टिपणी**:** ही पदयात्रा आम्ही पारंपरिक पद्धतीने, पुण्याच्या सांस्कृतिक वारशाला सांभाळून काढतो म्हणून दोन एक डझन LGBTQ समुदायाच्या व्यक्तींनी फर्ग्युसन कॉलेज जवळ, रस्त्याच्या विरुद्ध बाजूला उभे राहून, निषेध फलक दाखवले.

याला आमचं उत्तर असं  आहे की: आम्ही अशा पदयात्रेत नंगा नाच होऊ देणार नाही. त्या त्या शहराची सभ्यता सर्वांनी पाळली पाहिजे. पुणे म्हणजे दिल्ली किंवा मुंबई नाही. ज्यांना आमचे म्हणणे पटत नाही, त्यांनी स्वतंत्र पदयात्रा काढावी व नंगा नाच करणे. यासाठी पोलिसांकडे खुशाल परवानगी मागावी.







PUNE IS TALKING ABOUT

BACK WITH PRIDE!

Pune celebrates love, as pride march comes back after 2 years



Reflection

Pride Month special

Pune's queer community awaits the day when it can say... I DO!

पुणे टाइम्स ०७.०६.२०२२ पुणे टाइम्स मिरर ०७.०६.२०२२

## बिंदू क्विअर राईट्स फाऊंडेशन

संस्थापक: बिंदुमाधव खिरे, टिनेश चोपडे
लेखक: बिंदुमाधव खिरे

### संपर्क

ई-मेल: bqrf2019@gmail.com
व्हॉट्सॲप : 9763640480
वेबसाईट: http://www.binduqueerrights.org

### माहिती


बिंदुमाधव खिरे एलजीबीटीआयकयूए+ॲक्टीव्हिस्ट आहेत. ते स्वतः गे आहेत. ते दोन दशकांहून अधिक काळ या विषयावर काम करत आहेत. त्यांनी या विषयांवर १२ पुस्तके (मराठी व इंग्रजी) लिहिली/संपादित केली आहेत. त्यांनी पुणे जिल्ह्यात २०११ साली पहिली एलजीबीटीआयकयूए+ अभिमान पदयात्रा काढली. त्यांनी २००२ मध्ये समपथिक ट्रस्ट (इ ३६६२, पुणे) ही संस्था एलजीबीटीआयकयूए+ समाजाच्या आरोग्य व अधिकारांसाठी स्थापन केली. ही संस्था २०२१ मध्ये बंद करण्यात आली. २०१९ साली त्यांनी 'बिंदू क्विअर राईट्स फाऊंडेशन (Section 8 Company)' स्थापन केली व ते या कंपनीचे अध्यक्ष आहेत.

### एप्रिल २०२२ ते जून २०२२ मधील कार्य

**रात्र निवारा:** १७.०५.२०२२ हा IDAHOT(International Day against Homophobia, Biphobia and Transphobia) दिवस मानला जातो. तातपुरता राहण्यासाठी/रात्र निवारा- तृतीयपंथीयांसाठी 'गरिमा गृह' आहेत, समलिंगी स्त्रिया/उभयलिंगी स्त्रिया/ तृतीयपंथी पुरुषांसाठी स्त्री आधार संस्था आहेत पण समलैंगिक तरुणांसाठी अशी कोणतीच व्यवस्था नाही. म्हणून, या IDAHOT दिवशी, बिंदू किअर राईटस फौंडेशन नी २-३ समलिंगी तरुणांसाठी तात्पुरती राहायची व्यवस्था('Temporary Shelter Home') ऑफिस मध्ये सुरु केली. त्याच दिवशी बिहार मधून एक तरुण राहायला आला. तो सध्या या ऑफिस चा सुपरवायझर म्हणून काम सांभाळत आहे.

**महाराष्ट्र क्विअर वृत्त या ई-मासिकाचा पहिला अंक प्रकाशन:** १७.०५२०२२ ला महाराष्ट्र क्विअर वृत्त या ई-मासिकाचा पहिला अंक, भारताचे LGBTIQA चळवळीचे पहिले ॲक्टीव्हिस्ट, श्री अशोक राव यांचा हस्ते प्रकाशित झाला.


**'Working Together: Bridging the Gap between LGBTIQA and Medical Practitioners'** (लेखक/ प्रकाशक) बिंदुमाधव खिरे: में २०२२ मध्ये या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या पुस्तकाच्या प्रतीचे मोफत वितरण महाराष्ट्रातील विविध वैद्यकीय महाविद्यालयाच्या मानसोपचार विभागातील प्राध्यापक, क्लिनिकल सायकोलॉजीस्ट व PG मानसोपचारतज्ज्ञ विद्यार्थ्यांना देण्याचा उपक्रम चालू आहे.




लेखक व प्रकाशक LGBTIQA अ‍ॅक्टीव्हिस्ट बिंदुमाधव खिरे

**सत्र:** २८.०४.२०२२ ला, मराठवाडा मित्र मंडळ संस्थेचे जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन च्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'एलजीबीटीक्यू लैंगिक अल्पसंख्याक समाज(LGBTIQA) आणि पत्रकारिता' यावर माहितीपर सत्र आयोजित करण्यात आले. बिंदुमाधव खिरे यांनी सत्र घेतले व अनिल उकरंडे, दामिनी सिन्हा(ट्रान्सवुमेन) यांनी अनुभव कथन केले. या सत्राला अंदाजे ३० विद्यार्थी होते. विभाग प्रमुख संतोष शेणई सर यांनी आम्हाला सत्रासाठी बोलावल्या बद्दल त्यांचे मनापासून आभार.

**सत्र:** ०६.०६.२०२२ ला, रानडे इन्स्टिट्यूट पुणे येथील जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशनच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'रीपोर्टिंग ऑन एलजीबीटी इश्युज' वर माहितीपर सत्र घेण्यातआले. बिंदुमाधव खिरे यांनी सत्र घेतले व अनिल उकरंडे, दामिनी सिन्हा(ट्रान्सवुमेन) यांनी अनुभव कथन केले. या सत्राला अंदाजे २५ विद्यार्थी होते. विभाग प्रमुख डॉ. उज्ज्वला बर्वे यांनी आम्हाला सत्रासाठी बोलावल्या बद्दल त्यांचे मनापासून आभार.



रानडे इन्स्टिट्यूट, पुणे येथील सत्रानंतर वाडेश्वर रेस्टॉरंट वर गप्पा मारताना- डावीकडून विजया, बिंदुमाधव व अनिल

# जिल्हा: पुणे व पिंपरी-चिंचवड विभाग

**युतक LGBTQ सपोर्ट ग्रुप**

संस्थापक: अनिल उकरंडे (समलिंगी पुरुष)

## संपर्क

संपर्क क्रमांक: 8459456178
Fb insta page: @yutak.lgbtiq
ई-मेल: ukarandeanil@gmail.com

## एप्रिल २०२२ ते जून २०२२ मधील कार्य

**सपोर्ट ग्रुप मीटिंग:** दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी आम्ही मंथली मीटिंग म्हणजेच Qmeets घेत असतो. ही मीटिंग कोणताही अजेंडा घेऊन चालवली जात नाही. अशा मंथली मिटींगला येणाऱ्या तरुण व्यक्तींची संख्या वाढताना दिसते, एप्रिल ते जून महिन्याच्या मीटिंगमध्ये विशेष करून समलिंगी व उभयलिंगी (Lesbian and Bisexual women) स्त्रियांचा वाढता सहभाग दिसत आहे. एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांत सहभागींचा आकडा अनुक्रमे- 67, 61, 73 असा दिसून आला.




Qmeet

**ट्रेक:** १५.०६.२०२२ ला आम्ही एक दिवसीय ट्रेक आयोजित केला- किल्ले चंदन वंदन आणि अजिंक्यतारा. हा एक छोटासा फिरता सपोर्ट ग्रूप बनवला आहे. या ग्रुप मद्धे ट्रेक आणि फिरणे यातून मानसिक आरोग्य त्याच बरोबर शारीरिक आरोग्य यावर भर देणार आहोत. या ट्रेकमध्ये १६ उत्साही व्यक्तींनी सहभाग घेतला.




**पियर कौन्सिलिंग आणि समुपदेशन:** ब्रेकअप नंतरचे नैराश्य आणि वाढलेला मानसिक तणाव यासाठी एक समलिंगी पुरुष आणि लेस्बिअन कपल यांना पिअर कौन्सिलिंग करण्यात आले.

जून महिन्यात एका तरुणाने आपण समलिंगी आहे हे सांगितले. तेव्हा त्याच्यासोबत, त्याच्या आईशी बोलून 'affirmative Parent's Counselling' केले गेले. आई आपल्या मुलाचा स्वीकार करण्याचा प्रयत्न करत आहे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

**HIV/AIDS:** युतकने, नव्याने एचआयव्ही संक्रमित झालेल्या, २ व्यक्तींना राहण्यासाठी आणि एआरटीच्या (Anti Retroviral Therapy) गोळ्या, ज्या संजीवनी म्हणून काम करतात, त्या मिळवून देण्यासाठी मदत केलेली आहे. तसेच ८ नवीन व्यक्तींना HIV टेस्टिंग साठी योग्य ठिकाणी रेफर करून मदत केली आहे.

**STI:** एका उभयलिंगी (Bisexual) व्यक्तीला लैंगिक अवयवावरची नागीण (Genital Herpes) यावर उपचारासाठी मार्गदर्शन आणि मदत करण्यात आली.

**कायदेशीर सल्ला आणि मदत:** आमच्याकडे १३ लुबाडणुकीचा तक्रारी आलेल्या असून त्यापैकी फक्त एक केस पोलीस स्टेशन पर्यंत पोहचली.

१६ मे रोजी, एका छुप्या बायसेक्युअल २४ वर्षीय तरुणाने आपल्या ताईच्या घरी डेटिंग ॲप वरून एका अनोळखी मुलाला डेट साठी बोलवले होते. डेटसाठी आलेल्या मुलाने आपण पोलीस आहोत आणि समलिंगी संबंध ठेवणे त्याला महागात पडू शकते असे धमकावून, मारून वीस हजार रुपये रोकड त्याच्याकडून काढून घेतली आणि फरार झाला. 20 मे रोजी त्यांनी आम्हाला कॉल करून घडलेला वृत्तांत सांगितला आणि त्यावर आम्ही पोलिसांतर्फे मदत करून, आरोपीला पकडवून त्याचे वीस हजार रुपये त्याला परत मिळवण्यास मदत केली. उमेश लोंढे, सहाय्यक पोलिस निरीक्षक (API) आणि हेड कॉन्स्टेबल संजय गायकवाड सर यांनी आम्हाला यात मदत केली आम्ही त्यांचे आभारी आहोत.

हिजडा समाजातील एका तृतीयपंथी स्त्री आणि तिच्या पार्टनरला भावाकडून होणारी मारहाण, जीवे मारण्याची धमकी याच्या विरोधात पोलिसांकडे तक्रार नोंदविण्यासाठी मदत करण्यात आली.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मे महिन्यात आम्हाला ऑनलाईन फसवणूक, मारहाण यावर मदतीसाठीचे अनेक फोन आले पण तक्रारदारांनी स्वतः समोर येऊन पोलिसांकडे जाण्यास असमर्थता दाखवल्याने पुढे कोणत्याही प्रकारची कारवाई होऊ शकली नाही. बेकायदेशीर आणि नियमबाह्य पद्धतीने आम्ही मदत करत नाही याची सर्व वाचकांनी नोंद घ्यावी.

**तृतीयपंथी ओळखपत्र व प्रमाणपत्र:** या तीन महिन्यांच्या काळातआम्ही एकूण ५२ तृतीयपंथी व्यक्तींना शासनाकडून तृतीयपंथी ओळखपत्र आणि प्रमाणपत्र बनवून घेण्यास मदत केलेली आहे.


लोकमत

**अखेर तृतीयपंथी व्यक्तींना मिळाली स्वतःची ओळख**

**पुणे** : तृतीयपंथी नागरिकांनादेखील समाजामध्ये मानाचे, हक्काचे स्थान मिळावे यासाठी समाजकल्याण विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले. याचाच एक भाग म्हणून १५४ तृतीयपंथी नागरिकांना ओळखपत्रांचे वाटप करत हक्काची ओळख मिळवून देण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमांतर्गत महिला मेळावा व तृतीयपंथी व्यक्तींसाठी जनजागृती कार्यक्रमाचे घेण्यात आला. यावेळी शिक्षण उपसंचालक निशादेवी बंडबर, उपायुक्त रवींद्र कदम पाटील, साधना रणखंबे, सहायक आयुक्त संगीता डावखर, नीता होले, सोनाली दळवी, बिंदू माधव खिरे, कैलास पवार, प्रसाद गोंडकर, अनिल उकरंडे, डॉ. विजय मोरे उपस्थित होते.

Pune Main
Page No. 2 Apr 17, 2022
Powered by: erelego.com

**GD सर्टिफिकेट आणि हार्मोन्स संदर्भ सुविधा:** या तीन महिन्यात तीन तृतीयपंथी व्यक्तींना ही सुविधा पुरवली गेली आहे. ज्यातील एक जण तृतीयपंथीपुरुष (Transman)आहे.

तृतीयपंथीयांना रोजगार संधी: आम्हाला हे सांगताना विशेष आनंद होत आहे की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने तृतीयपंथी व्यक्तींना सुरक्षा रक्षक सहाय्यक आणि ग्रीन मार्शल म्हणून काम दिले ज्यात युतक कडून रेफर केलेल्या ४ व्यक्तींना नोकरी मिळाली. फ्लिपकार्ट INDIA यांनी देखील आम्ही रेफर केलीली एक तृतीयपंथी स्त्री (Transwoman) जुन २०२२ (प्राइड मंथ) मध्ये आपल्या ठिकाणीं टीम लीडर म्हणून रुजू केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि फ्लिपकार्ट यांचे मनापासुन आभार.

**जागृती आणि माहितीपर कार्यक्रम:**

१. दि. २८.०४.२०२२ ला बिंदू क्विअर राइट्स फाउंडेशन (BQRF) चा वतीने मराठवाडा मित्र मंडळ संस्थेचे जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन या विद्यार्थ्यांसाठी एलजीबीटीक्यू लैंगिक अल्पसंख्याक समाज आणि पत्रकारिता यावर जागृती आणि माहितीपर कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात अनिल उकरंडे यांनी अनुभव कथन केले.

२. दि. २६.०५.२०२२ ला फ्लिपकार्ट (मोशी हब) या ठिकाणी 'एलजीबीटी व्यक्तींसाठी सर्वसमावेशक 'वर्क पॉलिसी' यासाठी सेशन घेतले गेले.

३. दि. ०६.०६.२०२२ ला बिंदू क्वियर राइट्स फाउंडेशन (BQRF) च्या वतीने रानडे इन्स्टिट्यूट पुणे येथील जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांसाठी 'रीपोर्टिंग ऑन एलजीबीटी इसूज' वर जागृती आणि माहितीपर सेशन घेण्यात आले. या कार्यक्रमात अनिल उकरंडे यांनी अनुभव कथन केले.

४. दि. १६.०६.२०२२ ला विप्रो हिंजवडी (फेज 2) येथील सुरक्षारक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांसाठी 'फंडामेंटल्स ऑफ एलजीबीटीक्यू' या विषयावर माहितीपर कार्यक्रम घेण्यात आला.

५. दि. १९.०६.२०२२ ला पुरुषभान संवाद मंच' (महाड, रायगड जिल्हा) येथे लिंग, लिंगभाव आणि लैंगिक कल - कायदे, समज- गैरसमज या विषयावर दोन दिवसांचे निवासी सत्र घेण्यात आले.

६. दि. २६.०६.२०२२ ला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यावाणी, या कम्युनिटी रेडिओ मार्फत LGBTQ समाजाबद्दल गैरसमज, अंधश्रद्धा, कायदे आणि बदलणारा समाज या विषयावर कार्यक्रम प्रसारीत करण्यात आला.



MMCC: अनिल उकरंडे अनुभवकथन करताना



विप्रो कंपनीत LGBTIQA माहितीपर सत्र



रायगड येथील सत्रातील सहभागी

## जिल्हा: पुणे

**पुणेरी प्राईड फाऊंडेशन**
CIN (U85300PN2020NPL194705)
कंपनीचे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स: प्रसाद गोंदकर, निलेश माझिरे आणि बिपीन दुर्गाइ.

**संपर्क**:
संपर्क क्रमांक: 9822912112 / 8850021870
ई-मेल: team@puneripride.org
वेबसाईट: http://puneripride.org

**माहिती**:
पुणेरी प्राईड फाऊंडेशन हि कंपनी ऍक्ट २०१३ अंतर्गत रजिस्टर सेकशन ८ कंपनी आहे. समाजातील समलैंगिक (LGBTQ) आणि किन्नर वर्गाचे सामाजिक कल्याण करण्याच्या उद्देशाने पुणेरी प्राईड फाऊंडेशन कंपनीची स्थापना ०७-१०-२०२० रोजी करण्यात आली.

### एप्रिल २०२२ ते जून २०२२ मधील कार्य:

**´ट्रान्सजेन्डर सर्टिफिकेट्स´ वाटप:** दि. १५-०४-२०२२, शुक्रवार रोजी भारताच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिना निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाराष्ट्र शासन - सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, विश्रांतवाडी, पुणे, येथे आयोजित कार्यक्रमा मध्ये रविन्द्र कदम पाटील (उपायुक्त नागरी संरक्षण समाजकल्याण विभाग) यांच्या उपस्थितीत तृतीयपंथीयांना ´ट्रान्सजेन्डर सर्टिफिकेट्स´ वाटपामध्ये पुणेरी प्राईड फौंडेशन या कंपनीने सहभाग घेतला. तसेच या कार्यक्रमात तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून रणखांबे मॅडम (उपायुक्त नियोजन समाजकल्याण आयुक्तालय पुणे) इ. मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात समाजकल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय, विश्रांतवाडी येथे तृतीयपंथीय समाजाकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह आरक्षित करून दिले गेले.

या कार्यक्रमामध्ये पुणेरी प्राईड फौंडेशन या कंपनीने ढमढेरे गल्ली, बुधवार पेठ, पुणे येथील १० तृतीयपंथीयांना ट्रान्सजेन्डर सर्टिफिकेट्स मिळवून देण्यास मदत केली. या सर्टिफिकेटचे वाटप रविन्द्र कदम पाटील (उपायुक्त नागरी संरक्षण समाजकल्याण विभाग) तसेच संगीता डावखर मॅडम (साहाय्यक आयुक्त सामाजिक न्याय भाग व समाजकल्याण, पुणे) यांच्या हस्ते करण्यात आले. वरील कार्यक्रमात पुण्यातील अजूनही काही संस्था ज्या LGBTQ कम्युनिटीसाठी काम करतात, त्यामध्ये ´युतक ग्रुप´ यांच्या तर्फे सुद्धा काही तृतीयपंथीयांना ट्रान्सजेन्डर सर्टिफिकेट्स मिळवून देण्यात आली. या कार्यक्रमात पुण्यातील तृतीयपंथीय तक्रार निवारण समितीचे सदस्य बिंदुमाधव खिरे, सोनाली दळवी, युतक ग्रुप तर्फे अनिल उकरंडे, पुणेरी प्राईड फौंडेशनतर्फे प्रसाद गोंदकर व बिपीन दुर्गाई आणि अनेक संस्थांचे मान्यवर

उपस्थित होते. या कार्यक्रमात पुण्यातील तृतीयपंथीय तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष व बिंदू क्विअर राईट्स फौंडेशचे फाऊंडर - ॲक्टिव्हिस्ट बिंदुमाधव खिरे सरांनी तृतीयपंथीयांना ट्रान्सजेन्डर सर्टिफिकेट काढण्याचे महत्व व फायदे समजवून दिले.

एप्रिल २०२२ ते जुन २०२२ या तीन महिन्यांच्या कालावधी मध्ये पुणेरी प्राईड फौंडेशननी ३८ तृतीयपंथीयांना, तसेच आत्तापर्यंत ७४ तृतीयपंथीयांना ट्रान्सजेन्डर सर्टिफिकेट्स मिळवून दिलेली आहेत.



तृतीपंथियांना ओळखपत्र वाटप

**पर्यायी उपजीविका संधी (Livelihood Opportunities):** ´लर्न टू अर्न´ (Learn To Earn) या कार्यक्रमांतर्गत पुणेरी प्राईड फौंडेशने LGBTQ कम्युनिटीसाठी काही कोर्सेस उपलब्ध करून दिले आहेत. हे कोर्सेस कम्युनिटीच्या स्वारस्याचे-आवडीचे असावेत यासाठी कम्युनिटीमध्ये सर्वेक्षण करण्यात आले आणि त्यावरून मेकअप (Make Up), स्वयंपाक (Cooking) या विषयांसाठीचे कोर्सेस उपलब्ध करून देण्यात आले. या प्रकल्पामध्ये पुण्यातील तीन संस्थांनी पुणेरी प्राईड फौंडेशन बरोबर एकत्रित येऊन हा उपक्रम चालू केला आहे. यामध्ये वंदनाताई चव्हाण यांची स्माईल फाउंडेशन (SMILE) आणि पुणेरी प्राईड फौंडेशन यांची संयुक्त संकल्पना, लीना खांडेकर यांची लीज् इंटरनॅशनल ब्युटी अँड स्पा इन्स्टिटयूटतर्फे (Lee´s International Beauty and Spa Institute) प्रशिक्षणाची व्यवस्था, आणि सचिन अडसरे यांनी यार्दी वस्ती विकास प्रकल्पातर्फे (Yardi Vasti Vikas Prakalp) सी. एस. आर. (CSR) मधून फन्डीग सपोर्ट केलेला आहे.

पुणेरी प्राईड फौंडेशन तर्फे २८ LGBTQ कम्युनिटी मेम्बर्सनी बेसिक आणि त्यातीलच ८ LGBTQ कम्युनिटी मेम्बर्सनी पुढील ॲडव्हान्स मेकअप कोर्स पूर्ण केला आहे. उर्वरित LGBTQ कम्युनिटी मेम्बर्सची ॲडव्हान्स बॅच (ज्यांनी बेसिक कोर्स पूर्ण केला आहे) येत्या वर्षात पूर्ण होणार आहे.

या मेकअप कोर्सच्या एकूण तीन बॅचेस पूर्ण झाल्या आहेत ज्या मध्ये दोन बेसिक कोर्सच्या बॅच दि. ०५-०२-२०२१ ते २४-०३-२०२१ आणि दि. १९-०७-२०२१ ते ०७-०९-२०२१ या कालावधीत तसेच एक ॲडव्हान्स बॅच दि. २४-०१-२०२२ ते १०-०६-२०२२ या कालावधीत पूर्ण झाल्या आहेत. ॲडव्हान्स कोर्स पूर्ण केल्यानंतर कम्युनिटी मेम्बर्सना स्वतंत्र व्यवसाय सुरु करणे अथवा नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुणेरी

प्राईड फौंडेशन कार्यरत आहे. दि. २९-०७-२०२२ रोजी ऍडव्हान्स मेकअप बॅचच्या सर्व विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट वाटप करण्यात आले.

**आवाहन:** ज्या LGBTQ कम्युनिटी मेंबर्सना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण हवे असल्यास उदा. हेअर मेकअप ब्युटी अँड स्पा कोर्से, मेकअप - बेसिक अँड ऍडव्हान्स कोर्से, फॉरेन लँग्वेजेस, कॉम्पुटर कोर्सेस, फॅशन डिझायनिंग, कुकरी अँड बेकरी, जरदोजी वर्क इ. तसेच कोणत्याही प्रकारचे माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण (Academic Education) अर्धवट राहिले असल्यास आणि पूर्ण करण्याची इच्छा असल्यास त्वरित खालील नंबर्सवर संपर्क साधावा.

प्रसाद: ९८२२९१२११२ / ८८५००२१८७०, बीपीन: ८२३७८०३३३०, निलेश: ९९६०१६७३५३




ॲडव्हान्स मेकअप बॅच

**प्राईड मंथ सेलेब्रेशन:** दि. ०५-०६-२०२२, रविवार रोजी बिंदू क्वीअर राईट्स फौंडेशन आणि युतक ग्रुप तर्फे आयोजित पुणे LGBTQIA प्राईड वॉक २०२२ (वर्ष दहावे) मध्ये पुणेरी प्राईड फौंडेशनने सहभाग घेतला होता.

दि. २५-०६-२०२२, शनिवार रोजी प्राईड मंथच्या निमित्ताने पुणेरी प्राईड फौंडेशन आणि सहेली एच.आय. व्ही / एड्स कार्यकर्ता संघ याच्या संयुक्त विद्यमानाने रेशन किट वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. या अंतर्गत १४० कम्युनिटी मेम्बर्सना रेशन किट्सचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात रूपा टाकसाळ (कम्युनिटी लीडर - प्रथम सिक्युरिटी गार्ड, पिंपरी चिंचवड महानगर पालिका) आणि जॉन पॉल स्लम डेव्हलपमेंट प्रोजेक्ट, पुणे यांनी समुदाय एकत्रीकरणामध्ये (कम्युनिटी मोबिलाझेशन) मदत केली. संपूर्ण LGBTQ (ट्रान्सजेन्डर, ट्रान्स मेन्स्, बायसेक्शुअल्स्, लेस्बिअंस्, शीमेल्स्) कम्युनिटी पर्यंत रेशन किट्स पोहचविण्यात आले. या उपक्रमाला 'द गिविंग बॅक फंडस्' संस्थे तर्फे 'कोविड रिलीफ फंड' अंतर्गत फंडिंग सपोर्ट केला होता.



रेशन किट वाटप

**LGBTQ कम्युनिटी सपोर्ट:** पुणे, बिबवेवाडी येथील रहिवासी तृतीयपंथीय समाजातील एक तृतीयपंथी MND या आजारानी ग्रस्त आहे. हा आजार लाखांमध्ये एखाद्याला होतो. या आजारामध्ये शरीरातील एक एक अवयव हळूहळू काम करेनासा होतो. यालाच मोटर नयूरॉन डिसीस (MND) असे म्हणतात. या आजारावर फिजिओथेरपी सोडल्यास कोणताही औषधोपचार उपलब्ध नाही. गेल्या ५ वर्षा पासून ही तृतीयपंथीय या आजाराशी झुंजत आहे. एके काळची ही लावणी नृत्यांगना तृतीयपंथी आज अंथरुणाला खिळून आहे. आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे कि २४ तास कोणीतरी काळजी घेणाऱ्या व्यक्तीची आवश्यक्ता भासू लागली आहे.

अशा परिथितीत पुणेरी प्राईड फौंडेशनने तिच्या दोन्ही भावांशी मिटिंग (Advocacy) घेऊन मार्ग काढण्या बाबत चर्चा केली- तिच्यासाठी मेल (पुरुष) केअर टेकर ठेवावा किंवा तिला केअर सेंटरला भरती करावे. यासाठी येणारा खर्च पुणेरी प्राईड फौंडेशननी काही प्रमाणात उचलावा आणि उर्वरित खर्च दोन्ही भावांनी उचलावा असेही ठरवण्यात आले. पुणेरी प्राईड फौंडेशननी त्वरित भोसरी येथील एका नर्सिंग ब्युरो तर्फे एक मेल (पुरुष) केअर टेकर तिच्यासाठी आयोजित करून दिला आणि दर महिन्याला तिच्या साठी जेवढे पैसे जमा (फंड रेजिंग) करता येतील तेवढी मदत पुणेरी प्राईड फौंडेशन तर्फे करण्याची हमी दिली. पुणेरी प्राईड फौंडेशननी अनेक संस्थांकडे मदतीचे आवाहन करून दर महिना काही प्रमाणात पैसे जमा (फंड रेजिंग) करून, जमेल तेवढी सर्व रक्कम या तृतीयपंथी व्यक्तीला मिळवून दिली. त्याच प्रमाणे अनेक केअर सेन्टर्सना या तृतीयपंथी व्यक्तीला प्रत्यक्ष नेऊन तिथली चौकशी करण्यात पुणेरी प्राईड फौंडेशननी मदत केली.

**हेपेटायटीस B लसीकरण शिबिर:** दि. २६-०७-२०२२ मंगळवार रोजी पुणेरी प्राईड फौंडेशन, सहेली एच. आय. व्ही / एड्स कार्यकर्ता संघ आणि सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट अँड ॲक्टिव्हिटीज (CYDA) यांच्या संयुक्त विद्यमानाने हेपेटायटीस B लसीकरण शिबिराचे आयोजन पुणे शहरासाठी करण्यात आले होते. या

शिबीरात महिला सेक्स वर्कर, LGBTQ कम्युनिटी सेक्स वर्कर आणि LGBTQ कम्युनिटी मेम्बर्सचे लसीकरण करण्यात आले.

दि. ३१-०७-२०२२, रविवार रोजी पुणेरी प्राईड फौंडेशन, सहेली एच. आय. व्ही / एड्स कार्यकर्ता संघ याच्या संयुक्त विद्यमानाने हेपेटायटीस B लसीकरण शिबिराचे आयोजन पिंपरी-चिंचवड-निगडी विभागासाठीही करण्यात आले होते. या शिबीरात फक्त LGBTQ कम्युनिटी सेक्स वर्कर आणि LGBTQ कम्युनिटी मेम्बर्सचे लसीकरण करण्यात आले.

वरील उपक्रमा करिता टाटा मोटर्सच्या मेडिकल ऑफिसर, डॉ. शशिकला विश्वकर्मा यांच्याकडून टाटा मोटोर्स- सी. एस. आर. (CSR) अंतर्गत ३०० हेपेटायटीस B लसीकरणाचे तिन्ही डोसेस युनिक हॉस्पिटलतर्फे सेक्स वर्कर्स आणि LGBTQ मेम्बर्सना मोफत उपलब्ध करून देण्यात आले. या उपक्रमामध्ये ८० महिला सेक्स वर्कर आणि २५ LGBTQ कम्युनिटी सेक्स वर्कर यांनी सहभाग घेतला होता आणि हा उपक्रम पुढील वर्षभर राबवण्यात येणार आहे.




हेपेटायटीस B लसीकरण शिबिर पुणे शहर

**सी. बी. ओ. सक्षमीकरण:** पुणेरी प्राईड फौंडेशन या सेक्शन ८ कंपनीच्या सक्षमीकरणाकरिता पुण्यामधील सोसवा ट्रैनिंग अँड प्रमोशन इन्स्टिटयूटने (STAPI) पुणेरी प्राईड फौंडेशनची पार्टनर एन. जी. ओ. म्हणून निवड केली आहे.

# जिल्हा: सोलापूर

## निरायम आरोग्य धाम

**संपर्क**

व्यवस्थापक: श्री.शिवाजी शिंदे
संपर्क क्रमांक: मो- 9860156270, ऑफिस- 0217-2326264
ई-मेल: nadti2msm799@gmail.com

लेखक: श्री.शिवाजी शिंदे व प्रदीप पाटील

**माहिती**

निरायम आरोग्य धाम (NAD) ही संस्था समलिंगी पुरुष आणि तृतीयपंथी समुदाय यांची सामाजिक सुरक्षितता, आरोग्य, शिक्षण व समुपदेशन सेवा-सुविधांसाठी काम करते. या संस्थेची स्थापना 1991 साली झाली. संस्थेचे अध्यक्ष, श्री.भालचंद्र किणीकर आहेत व संचालिका, आ. श्रीमती सीमा किणीकर आहेत. निरायम आरोग्य धाम (NAD) सोलापूर जिल्ह्यात शरीर विक्री करणाऱ्या स्त्रिया(FSW), पुरुषांशी शरीर संबंध करणारे पुरुष (MSM), तृतीयपंथी, HIV संसर्गित व्यक्तींसाठी काम करते. या समाजाचे आरोग्य, अधिकार, शिक्षण या कार्यक्रमांवर संस्थेचा भर आहे.

## एप्रिल २०२२ ते जून २०२२ मधील कार्य:

### नेत्र शिबिर व आरोग्य मार्गदर्शन

दिनांक: ०६.०४.२०२२

लाभार्थी: ३०

प्रमुख अतिथी: इनरव्हील क्लबचे मान्यवर डॉ. शहाणे सर (PPP-DR),
गणेश तांदळे सर(SMC-LT,सोलापूर),
सीमा किणीकर (निरामय आरोग्य धाम-प्रकल्प संचालिका, सोलापूर),
शिवाजी शिंदे (प्रकल्प व्यवस्थापक, NAD –MSACS – TI - 2 CC, सोलापूर)

दि. ०६.०४.२०२२ रोजी 'निरामय आरोग्य धाम' या ठिकाणी निरामय आरोग्य धाम-MSACS व इनरव्हील क्लब, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र शिबिर व आरोग्य मार्गदर्शन आयोजन करण्यात आले.



नेत्र शिबिर तपासणी करताना

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी शिंदे (प्रकल्प व्यवस्थापक, NAD –MSACS – TI - 2 CC, सोलापूर)यांनी केले.

हेमा मॅडम यांनी नेत्र शिबिर घेतले व आरोग्य मार्गदर्शन केले. यामध्ये डोळ्यांची काळजी कशी घ्यावी, त्यांची निगा कशी राखावी या विषयी माहिती दिली. दैनंदिन जीवनामध्ये आपण आपल्या आरोग्य कडे म्हणावे तितके लक्ष न दिल्या मुळे काही नेत्र आजार होऊ शकतात त्या करता आपण वेळेत तपासणी करणे व काळजी घेणे अत्यावशक आहे असे सांगत त्यांनी अतिशय सोप्या शब्दांत मार्गदर्शन केले.



गणेश तांदळे सर मार्गदर्शन करताना

इनरव्हील क्लब, सोलापूर यांनी सुद्धा हा उपक्रम चांगला आहे व इतर आरोग्य तपासणी पेक्षा वेगळी तपासणी निवडून लाभार्थी यांना खऱ्या अर्थाने लाभ मिळाला आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सतीश सर यांनी केले.

## तृतीयपंथी प्रमाणपत्र ओळखपत्र एक दिवसीय कार्यशाळा शिबिर

दिनांक: २६.०५.२०२२

लाभार्थी : ३७

प्रमुख अथिती: मा. श्री. कैलास आढे (समाज कल्याण सहायक आयुक्त, सोलापूर.), मा.सुलोचना सोनवणे (समाज कल्याणच्या विशेष अधिकारी), मा. ॲड. लक्ष्मण मारडकर (वकील संघाचे माजी अध्यक्ष, सोलापूर), मा. श्री. नागेशकुमार गंजी (MSACS-PO, सोलापूर) मा. श्री. शिवाजी शिंदे (प्रकल्प अधिकारी-निरामय आरोग्य धाम –MSACS – TI - 2, सोलापूर),धीरज बिजुरे-MEA, संगीता गंधारे -समुपदेशक, रमेश वाघमारे, आदी उपस्थित होते.

दि. २६.०५.२०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, सात रस्ता येथे निरामय आरोग्य धाम व समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, सकाळी ११ वाजता, 'तृतीयपंथी प्रमाणपत्र व ओळखपत्र' या एक दिवसीय कार्यशाळाचे आयोजन केले होते. शिबिराचे उद्‌घाटन मा. श्री. कैलास आढे साहेब (सहायक आयुक्त समाज कल्याण) यांच्या हस्ते झाले.



मा. श्री. कैलास आढे (समाज कल्याण सहायक आयुक्त, सोलापूर.), मा. ॲड. लक्ष्मण मारडकर (वकील संघाचे माजी अध्यक्ष, सोलापूर), मा. श्री. नागेशकुमार गंजी (MSACS-PO, सोलापूर), मा. श्री. शिवाजी शिंदे (प्रकल्प अधिकारी, NAD –MSACS – TI - 2 CC, सोलापूर)

तृतीयपंथीयांना शासकीय लाभ घेण्यासाठी कोणतेही प्रमाणपत्र नव्हते. 'निरामय आरोग्य धाम' संस्थेने शिबिराद्वारे समाज कल्याण विभागाच्या सहयोगाने केंद्र सरकारच्या ऑनलाइन साईट- https://transgender.dosje.gov.in या राष्ट्रीय पोर्टलवर माहिती भरण्यास मदत केली. अशा शिबिरांमध्ये सहभागी होऊन शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन मा. श्री. कैलास आढे साहेब (समाज कल्याण सहायक आयुक्त, सोलापूर) यांनी केले. यापुढेही, तृतीयपंथीयांसाठी, अशी शिबिरे 'निरामय आरोग्य धाम' व समाज कल्याण विभागाच्या सहयोगाने भरविण्यात येणार आहेत.



पियर एज्युकेटर रुपेश निराळे मनोगत व्यक्त करताना

निरामय आरोग्य धाम, सोलापूर संस्थेने आतापर्यंत ६९ तृतीयपंथीयांना प्रमाणपत्र वाटप केले आहे असे मा. श्री. कैलास आढे साहेब (समाज कल्याण सहायक आयुक्त, सोलापूर) यांनी सांगितले तसेच महाराष्ट्रात आपला तिसरा क्रमांक आहे असे त्यांनी सांगितले. वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. लक्ष्मण मारडकर यांनी सर्वांना नोटरीचे काम मोफत करून दिले. ॲड. लक्ष्मण मारडकर यांनी तृतीयपंथीयांना मार्गदर्शन केले. तृतीयपंथीयांनी असे ओळखपत्र मिळण्यासाठी मदत करावी असे आवाहन केले. निरामय संस्थेचे कार्यक्रम अधिकारी शिवाजी शिंदे, श्री. धीरज बिजुरे ,संगीता गंधारे -समुपदेशक, रमेश वाघमारे, आदी उपस्थित होते.

# जिल्हा: वर्धा

## ‘कन्वर्जन थेरेपी’वरील गैरसमजुतीचा थर पुसणे गरजेचे

लेखक: डॉ. इंद्रजित खांडेकर
लेखक राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या कन्व्हर्जन थेरपीसंदर्भातील समितीचे सदस्य आहेत. प्राध्यापक वैद्यकीय महाविद्यालय सेवाग्राम, वर्धा .

संपर्क : drindrajitkhandekar@gmail.com

‘कन्वर्जन थेरेपी’ (रूपांतरण थेरपी) म्हणजे उपचारांनी किंवा समुपदेशनाने समलिंगी व्यक्तीकडे लैंगिक ओढा असलेल्या व्यक्तीच्या मनात भिन्नलिंगी सहज नैसर्गिक प्रवृत्ती निर्माण करणे होय. हा विषय समजून घेण्यासाठी प्रथम लैंगिक कल म्हणजे काय, समलैंगिक व्यक्तींच्या काय अडचणी आहेत, व या अशा अघोरी उपचारावर तज्ज्ञ समितीच्या सुचनेनुसार मद्रास उच्च न्यायालयाने बंदी का आणली आहे हे समजून घेणे क्रमप्राप्त ठरते. एखाद्या व्यक्तीची सहज लैंगिक प्रवृत्ती (सेक्शुअल इंटरेस्ट) बदलण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपचार पद्धतीवर बंदी आणण्यात येईल असे प्रतिज्ञापत्र भारतीय वैद्यकीय आयोगाने मद्रास उच्च न्यायालयात दाखल केल्यानंतर हा विषय ऐरणीवर आला.

साधारणत : लैंगिक कलाची (sexual orientation) चर्चा सहसा खालील श्रेणींमध्ये केली जाते: १) **भिन्नलिंगी** (हेट्रोसेक्सुअल): इतर लिंगाच्या **व्यक्तींबद्दल** भावनिक, रोमँटिक किंवा लैंगिक आकर्षण असणे. २) **समलिंगी/गे /होमोसेक्सुयल/ लेस्बियन**: स्वतःच्या लिंगाच्या व्यक्तीबद्दल भावनिक, रोमँटिक किंवा लैंगिक आकर्षण असणे. ३) **उभयलिंगी (बायसेक्सुयल**) : स्त्री आणि पुरुष या दोन्ही बद्दल भावनिक, रोमँटिक किंवा लैंगिक आकर्षण असणे) आणि ४) **अलैंगिक** (असेक्सुयल): स्त्री आणि पुरुष या दोन्ही बद्दल लैंगिक आकर्षण नसणे (लैंगिक बाबतीत हे लोक उदासीन असतात). एका स्त्रीचा लैंगिक कल दुसऱ्या स्त्रीकडे असेल तर त्याला **लेस्बियन** म्हटले जाते. एका पुरुषाचा लैंगिक कल दुसऱ्या पुरुषाकडे असल्यास समलिंगी किंवा **गे** असे म्हटले जाते.

लैंगिक कल हा जन्मावेळी ठरलेला असतो व सामान्यत: तो वयात आल्यावर आणि पौगंडावस्थेच्या सुरवाती दरम्यान प्रकट होतो. मुलाला पालकांनी कसे वाढवले आहे यावरून लैंगिक कल ठरत नाही. त्या मुलाचे लहानपणी लैंगिक शोषण केले तर तो संमलैंगिक होतो- हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. लैंगिक कल हा कोणत्याही पूर्व लैंगिक अनुभवाशिवाय उद्भवू शकतो. कुणाशीही लैंगिक संबंध प्रस्थापित न केलेल्या व्यक्ती सुद्धा त्यांचा स्वत:चा लैंगिक कल काय आहे हे समजू शकतात. तसेच काही लोक लैंगिक संबंध प्रस्थापित केल्या नंतर त्यांचा लैंगिक कल काय आहे हे सांगू किंवा घोषित करू शकतात.

प्रौढ व्यक्तींमध्ये स्वेच्छेने व संमतीने होणाऱ्या समलैंगिक संबंधाला सर्वोच्च न्यायालयाने गुन्हेगारी कृत्य नसल्याचे जाहीर केल्यानंतरही भारतातील समलैंगिक समुदायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन फारसा बदललेला नाही.

रूपांतरण थेरपीसाठी कुटुंबाने भाग पाडल्या नंतर व्यक्तींनी आत्महत्या केल्याचे किंवा तसा प्रयत्न केल्याची बरीच उदाहरणे आपल्या देशात सुद्धा आहेत. तसेच, रूपांतरण थेरपीमुळे मानसिक आरोग्याच्या समस्या

उद्भवतात. यामध्ये पेशंट आत्महत्येचा विचार करू शकतो, असे वैज्ञानिक संशोधन सांगते. समलैंगिक समुदायातील अनेकांना अश्या प्रकारच्या उपचाराला व त्यापासून होणाऱ्या त्रासाला सामोरे जावे लागते.

समलैंगिकता हा आजार असून तो वैद्यकीय मार्गाने बरे करता येण्यासारखा आहे, या गैरसमजात बरेच लोक वावरतात.

समलिंगी व्यक्तीला समाजात वावरणे अत्यंत वेदनादायी असते. आपली लैंगिकता इतरांना कळली तर आपल्याला बहिष्कृत करण्यात येईल किंवा वाळीत टाकले जाईल या भीतीमुळे अपवाद वगळता बहुतेकांना लैंगिकतेबद्दल खूप लाज वाटते व ते अपराधीपणाची भावना बाळगतात. यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. नैराश्य येते, अभ्यासातून, करियरमधून लक्ष उडते. घरच्यांना कळले तर त्यांना किती त्रास होईल म्हणून जीव गुदमरतो. आत्महत्येचे विचार येऊ लागतात. व अनेकजण आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात.

## उपचाराच्या थोतांडावर विश्वास नको

आपला समाज आपली लैंगिकता स्वीकारणार नाही, म्हणून ते बदलायचा मार्ग शोधतात. आणि समलिंगीद्वेष्ट्या डॉक्टरांच्या जाळ्यात सापडतात. काही समलैंगिक व्यक्तींना डॉक्टर सांगतात "लग्न कर, म्हणजे भिन्नलिंगी आकर्षण आपोआप निर्माण होईल". या असल्या सल्ल्यावर विश्वास ठेवून पालक त्यांचे लग्न लावतात. अशा चुकीच्या सल्ल्यांनी समलैंगिक कल तर बदलत नाहीच पण मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त होऊन संसाराचा बट्ट्याबोळ होतो. अनेक समलिंगी व्यक्तींच्या या यातना व त्यातून त्यांची होणारी फसवणूक बंद व्हावी म्हणून तज्ज्ञ समितीच्या सुचनेनुसार मद्रास उच्च न्यायालयाने कन्व्हर्जन थेरेपी (रूपांतरण थेरेपी) वर बंदी आणायचा आदेश दिला.

तसेच कुठला वैद्यकीय व्यावसायिक असे करीत असेल तर ते भारतीय वैद्यकीय परिषद (व्यावसायिक आचरण, शिष्टाचार आणि नीतिशास्त्र) नियमन-२००२ नुसार अनैतिक आचरण आणि व्यावसायिक गैरवर्तन ठरेल असे प्रतिज्ञापत्र राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने मद्रास उच्च न्यायालयात सादर केले आहे. मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन. आनंद व्यंकटेश यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमातील एलजीबीटीक्यूआयए (लेस्बियन- समलिंगी स्त्री, गे- समलिंगी पुरुष, बायसेक्सुयल-उभयलिंगी, ट्रान्सजेंडर, क्विअर, इंटरसेक्स (द्विलिंगी ), अलैंगिक इत्यादि) समुदाया संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी दिलेल्या आदेशांनुसार राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा अरुणा वाणीकर यांनी स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीच्या शिफारशींवर राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने न्यायालयासमोर वरील प्रतिज्ञापत्र सादर केले.

कन्वर्जन थेरेपीचा उद्देश एखाद्या व्यक्तीचा लैंगिक कल बदलणे हा असतो. आधीच सांगितल्याप्रमाणे लैंगिक कल हे विविध प्रकारचे असू शकतात व ते सर्व नैसर्गिक आहेत म्हणूनच सामान्य आहेत. आणि एखाद्या समलिंगी व्यक्तीचा लैंगिक कल बदलून तो भिन्नलिंगी करण्यासाठी कोणताही वैद्यकीय उपचार उपलब्ध नाही, हे समजून घेणे आवश्यक आहे.

बरेचदा मुखमैथुन, किंवा गुदामैथुन जरी ते भिन्नलिंगी (म्हणजे स्त्री व पुरुष) व्यक्ति करीत असेल तरीही याबद्दल नकारात्मक बोलले जाते. निसर्गाने जो अवयव ज्या कामासाठी दिला आहे तो अवयव त्याच

कारणासाठी वापरला जावा असेही मत मांडतात. परंतु ते हे समजून घेत नाहीत की आपण शरीराचे अनेक भाग वेगवेगळ्या कार्यासाठी वापरतो. तोंडाचे कार्य खाणे आणि बोलणे असले तरी चुंबन घेण्यास आपण उपयोग करीत असतो. हे ही समजून घेणे आवश्यक आहे की लैंगिक संबेध फक्त प्रजननासाठीच ठेवले जात नाही. तसे असते तर गुप्तांगा व्यतिरिक्त शरीराच्या इतर कुठल्याही भागात लैंगिक संवेदना नसत्या.

काही लोकांचे म्हणणे आहे की समलिंगी आकर्षण हे अनैसर्गिक आहे. निसर्गाने काय नैसर्गिक व काय अनैसर्गिक ठरविले असेल हे ठरविण्या इतपत तरी मानव सक्षम नाही, असे मी मानतो. तसेच काही लोकांच्या मते समलिंगी आकर्षण हा निवडलेला पर्याय आहे. ही समजूत पण साफ चुकीची आहे. कारण समलिंगी कल हा उपजत येतो. तो काही शिकविता येत नाही. जर समलिंगी आकर्षण उपजत आहे तर समलिंगी संभोग करण्याची इच्छा होणेही स्वाभाविक आहे. समलैंगिक असणे ही विकृती आहे, या पूर्वग्रहदूषित विचाराने ती समूळ नष्ट केली पाहिजे या दृष्टीतून बरेच प्रयत्न करण्यात आले होते. परंतु याचे विपरीत परिणामच जास्त झाले. यावरून हे समजून घेणे आवश्यक आहे की प्रत्येकाची आवड नावड वेगवेगळी आहे. आपल्याला जे करणे आवडत नाही तेच दुसऱ्यालाही आवडू नये असे होऊ शकत नाही. आपल्या आवडी निवडी इतरांवर लादण्यापेक्षा आपल्याला जी लैंगिक क्रिया आवडते ती आपण करावी व इतरांना जी लैंगिक क्रिया आवडते ती त्यांना करू द्यावी. इथे हे नमूद करणे महत्वाचे आहे की या किंवा इतर कुठल्याही लैंगिक क्रिया सहभागी असलेल्या सर्व प्रौढ पार्टनर्सच्या संमतीने व स्वेच्छेने व्हायला हव्यात. दोघे पती-पत्नी असले तरीही आणि नसले तरीही.

कन्वर्जन थेरपीमध्ये सुधारात्मक हिंसा, मानसोपचार, अवैध औषधोपचार (अँटी-सायकोटिक्स, अँटी-डिप्रेसंट्स, अँटी-अँझायटी, आणि सायकोएक्टिव्ह ड्रग्स आणि हार्मोन इंजेक्शन्सचा) तसेच इलेक्ट्रोशॉक किंवा इलेक्ट्रोकॉनव्हल्सिव्ह थेरपी इ. चा समावेश होतो. यातून समलिंगी व्यक्ती आणखी एकलकोंडे होऊ शकतात. रूपांतरण उपचारांमुळे जास्त झोपणे किंवा झोप न येणे, अनाहूत फ्लॅशबॅक, अत्यंत क्लेशकारक दुःस्वप्न आणि पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर होऊ शकते. यामुळे अत्यंत अपमानास्पद व लाजिरवाणे वाटणे, तसेच त्यामुळे अपराधीपणा, स्वतःची घृणा आणि नालायकपणाची तीव्र भावना निर्माण होते.

समाज, पालक, मित्र, सहकाऱ्यांनी समलिंगी व्यक्तींना स्वीकारले, त्यांच्याशी संवेदनशीलपणे वागले, इतर समाजासारखी त्यांनाही मानवी वागणूक दिली तरच इतर लैंगिकतेच्या लोकांना सुखाने जगायला मिळेल.

समितीमध्ये माझ्यासोबत **डॉ. वीजेन्द्र कुमार (दिल्ली), डॉ. प्रभा चंद्रा (सायकियार्टी विभाग-गलोर), डॉ. सुरेखा किशोर (एम्स- गोरखपुर)**, हे तज्ज्ञ होते. या समितीला **स्वभाव ट्रस्ट-** बंगलोर, **टीस क्वीअर ग्रुप, डॉ. भूषण शुक्ला** (पुणे), **बिंदुमाधव खिरे (पुणे)**, **डॉ. हर्षल साठे** (सेवाग्राम), **डॉ. बी. एच. तिरपुडे** (सेवाग्राम) यांचे मोलाचे सहकार्य लाभले.


पुणे LGBTIQA अभिमान पदयात्रा 2022
Learn to Earn
BINDU
QUEER RIGHTS
FOUNDATION
बिंदू क्विअर राइट्स फाऊंडेशन